# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १० (प्रतिनिधी) : नेत्रदान, त्वचादान, देहदान याबाबत फेडरेशन ऑफ ऑर्गन अॅण्ड बॉडी डोनेशन मुंबई, या सामाजिक संस्थेतर्फे जनप्रबोधन करणारी रथयात्रा काढण्यात आली असून ही रथयात्रा मंगळवार दि. १३ फेब्रुवारी रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात येणार आहे.

नाशिक ते आनंदवन अशी १४३० कि.मी. ची ही रथयात्रा आयोजित करण्यात आली आहे. विद्यापीठ अनुदान आयोग यांनी काढलेल्या परिपत्रकानुसार अवयवदाना विषयी जनजागृती करण्याची जबाबदारी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर सोपविण्यात आली आहे त्या अनुषंगाने विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचा वतीने मंगळवारी दुपारी २.०० वाजता विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात पुरुषोत्तम पवार, अध्यक्ष व सुनिल देशपांडे, उपाध्यक्ष फेडरेशन ऑफ ऑर्गन अॅण्ड बॉडी डोनेशन मुंबई हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. अशी माहिती विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव दि. १० (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या माध्यमातुन मुक्ताईनगर येथील जगजीवनदास इग्रंजी शाळा व कनिष्ठ महाविद्यालय विद्यार्थ्यांना मोबाईल सायन्स व्हॅन दाखविण्यात आली.

समन्वयक डॉ. एस.एस.घोष यांच्या समन्वयाने प्रा. अमरदीप पाटील, विद्यापीठातील विद्यार्थी आकांक्षा महाजन, गौरी पाटील, अस्मिता पाटील, करनसिंग राजपुत यानी या मोबाईल सायन्स व्हॅन मधील २९ विज्ञान प्रयोगांची माहिती ४०० विद्यार्थ्यांना दिली. याशिवाय कुऱ्हाकाकोडा, ता. मुक्ताईनगर येथील लक्ष्मी नारायण आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना देखील हे विज्ञान प्रयोग दाखविण्यात आहे.

……………………………………………………………………………………………………………..

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १० फेब्रुवारी, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी